जा.क्र.विशा/राजकीय/ /२०२६
विशेष शाखा,पिंपरी चिंचवड
दिनांक :- २९ /१०/२०२६

आदेश,

विषय :- भारतीय नागरीक सुरक्षा संहिता (BNSS)- २०२३ चे कलम १६३ प्रमाणे मनाई आदेश

ज्याअर्थी, मा.भारत निवडणुक आयोग यांचेकडील पत्र क्र .ECI/PN/118/2026 dt.22.09.2026 रोजीच्या प्रसिध्दी पत्रकान्वये विधान परिषद - २०२६ शिक्षक व पदवीधर मतदार संघ निवडणुका- २०२६चा निवडणुक कार्यक्रम घोषित केले असून त्याबाबतचे पत्र मा.विभागीय आयुक्त कार्यालय,पुणे यांचे कडुन याकार्यालयास प्राप्त झाले आहे. दि.२३.१०.२०२६ रोजी मतदान व दि.२७.१०.२०२६ रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात एकुण २० मतदान केंद्र व ३५ बुथवर मतदान होणार आहे.

ज्याअर्थी निवडणुक आयोग , भारत सरकार यांचे कडील पत्र क्र.६४/आय.एन.एस.टी/२००७/पी.एल.एन.-१/ दि.०८/०१/२००७ व दि.२७/०२/२००७ अन्वये प्रचार संपल्यानंतरच्या वेळेपासुन मतदान प्रक्रिया पुर्ण होईपर्यतच्या कालावधीत राजकीय व्यक्ती जर ते त्या मतदारसंघातील नसतील तर ते त्या मतदारसंघात थांबणेबाबत प्रतिबंध करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

मतदान प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी सार्वजनिक शांततेला व मालमत्तेला धोका पोहचु नये व सार्वजनिक शांतता बिघडु नये यासाठी सर्व राजकीय व्यक्तींना किंवा राजकीय पक्षांशी संबंधीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीस ते ज्या विधानपरिषद शिक्षक व पदवीधर मतदार संघाचे मतदार नाहीत त्या मतदार संघात थांबणेस /वास्तव्य करण्यास प्रतिबंध करणे जरुरीचे आहे अशी माझी खात्री झालेली आहे.

ज्याअर्थी मी डॉ. शशिकांत महावरकर, पोलीस सह आयुक्त, पिंपरी चिंचवड, मला भारतीय नागरीक सुरक्षा संहिता (BNSS) चे कलम १६३ मधील प्राप्त झाले अधिकारान्वये असा आदेश देतो की, विधानपरिषद शिक्षक व पदवीधर मतदार संघासाठी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात दिनांक-२१/१०/२०२६ रोजी १७/०० वा पासुन ते दिनांक २३/१०/२०२६ रोजीचे २४/०० वा पर्यत खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

सर्व राजकीय व्यक्ती किंवा राजकीय पक्षांशी संबंधीत कोणतीही व्यक्ती ते ज्या विधानपरिषद मतदार संघाचे मतदार नाहीत,त्या मतदार संघात थांबणेस/वास्तव्य करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्तीस भारतीय न्याय संहिता (BNS)- २०२३ चे कलम २२३ अन्वये शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश माझे सही स्वाक्षरी/शिक्कयानिशी आज दि.२९/१०/२०२६ रोजी देणेत आला आहे.

ठिकाण :- पिंपरी चिंचवड
दिनांक :- २९ .१०.२०२६

सह पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड

(डॉ.शशिकांत महावरकर)
पोलीस सह आयुक्त, पिंपरी चिंचवड.

प्रत सविनय सादर :-

१. मा.अतिरिक्त मुख्य सचिव, गृह (विशेष) मंत्रालय, म.रा. मुंबई.
२. मा.पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई
३. मा.आयुक्त व अपर पोलीस महासंचालक, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा. मुंबई
४. मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड
५. अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड

प्रत :- सस्नेह अग्रेषीत :-

१. मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग
२. मा.आयुक्त म.न.पा.पुणे / पिंपरी चिंचवड म.न.पा.पुणे
३. मा.जिल्हा सत्र न्यायधिश, पुणे
४. मा.जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी पुणे
५. मा.सर्व निवडणूक निर्णय अधिकारी

प्रत :-

१. सर्व पोलीस उप आयुक्त, / सहा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड
जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे.
२/- या आदेशाचे स्थापनिक वृत्तपत्रातून प्रसिध्दी करावी.
२. व्यवस्थापक येरवडा मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय, पुणे.
२/- या आदेशास प्रसिध्दी देण्याकरीता आणि कार्यालयाच्या भांडारामध्ये ठेवण्यासाठी प्रती पाठविण्यात आल्या आहेत.

पोलीस आयुक्तालयातील सर्व वरिष्ठ पोलीस निरीक्षक व वाहतुक शाखेतील सर्व पोलीस निरीक्षक यांनी आपआपल्या हद्दीमध्ये या आदेशाची जास्तीत जास्त प्रसिध्दी होण्यासाठी ध्वनीक्षेपकाद्वारे किंवा अन्य मार्गाने प्रसिध्दी करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल सादर.